मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील नालेसफाईचे काम युद्धपातळीवर पूर्ण करा

## कामात दिरंगाई आढळ्यास होणार कारवाई : आयुक्त शेखर सिंह यांच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाच्या पाण्याचा निचरा प्रभावीपणे होण्यासाठी शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या नाल्यांची साफसफाई करण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच पुरपरिस्थिती सहजतेने हाताळण्यासाठी सर्व विभागांनी अंतर्गत समन्वय ठेवावा, असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी दिले.



पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने शहरात पावसामुळे उद्भवणाऱ्या प्रश्नांचे पूर्व नियोजन करण्यात येत आहे. आरोग्य विभागामार्फत शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत येणाऱ्या एकूण १४४ नाल्यांची साफसफाई करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच पावसाळ्याच्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीत पुरपरिस्थितीत उद्भवू नये तसेच सखल भागात पाणी साचू नये यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आयुक्त शेखर सिंह यांनी पुर्वनियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

### नाले साफसफाईच्या कामात दिरंगाई आढळ्यास होणार कारवाई

ज्या नाल्यांमध्ये साफसफाई करताना अडचणी येत आहेत त्या नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. आयुक्त शेखर सिंह यांच्या वतीने दररोज होणाऱ्या नाले सफसफाईच्या कामाचा आढावा घेतला जात असून नालेसफाईच्या कामामध्ये दिरंगाई आढळल्यास संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचे निर्देशही आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.

### जेसीबी, पोकलेन व स्पायडर मशिनच्या सहाय्याने नालेसफाई

पावसाळ्यात नालेसफाई संदर्भात कामे करण्यास अडथळा निर्माण होतो, त्यामुळे पावसाळा सुरू होण्यापुर्वी नालेसफाईचे काम महापालिकेच्या वतीने पुर्ण करण्यात येणार आहे. नालेसफाई करताना आवश्यक ठिकाणी जेसीबी, पोकलेन व स्पायडर मशिनने नालेसफाई करण्यात येत आहे, तसेच अरुंद नाल्यांच्या ठिकाणी सुरक्षा साधने वापरूनच नालेसफाई केली जात आहे. शहरातील विविध भागात बुजविलेले नाले, नाल्यावर किंवा नाल्यामध्ये केलेले अतिक्रमण तसेच नाल्याची रुंदी कमी केलेली आढळून आल्यास संबंधित व्यक्तीवर अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येत आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली आहे.

### 8 क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एकूण 144 नाले

» अ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत २५ नाले, ब क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १५ नाले, क क्षेत्रीय कार्यालयातंर्गत २९ नाले, ड क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १२ नाले तसेच इ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १६ नाले, फ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १८ नाले, ग क्षेत्रीय कार्यालयातंर्गत ९ नाले तर ह क्षेत्रीय कार्यालयातंर्गत २० नाले असे एकूण १४४ नाले महापालिका हद्दीमध्ये आहेत.

# पीएसआयने हटकल्याने चोरट्यांकडून गोळीबार

## पुणे-मुंबई महामार्गावरील लिंब फाट्याजवळील कॉलनीत घडलेल्या घटनेने खळबळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

बंद बंगल्यात चोरी करण्यासाठी आलेल्या चोरट्यांना पोलिस उपनिरीक्षकाने हटकले, त्यावेळी चोरट्यांनी गोळीबार करत धूम ठोकली. तळेगाव दाभाडे येथे पुणे-मुंबई महामार्गावरील लिंब फाट्याजवळील कॉलनीत गुरुवारी (दि.९) दुपारी चारच्या सुमारास घडलेल्या घटनेने खळबळ उडाली आहे.

देहूरोड विभागाचे सहायक पोलिस आयुक्त देविदास घेवारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव दाभाडे येथील लिंब फाट्याजवळील कॉलनीत पोलिस उपनिरीक्षक शाम शिंदे यांच्या घराचे बांधकाम सुरू आहे. शिंदे तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात नेमणुकीस आहेत. बांधकामाची पाहणी करण्यासाठी ते आले होते. त्यावेळी कॉलनीतील एका बंद बंगल्याबाहेर संशयित आढळून आला. संशयिताने चेहऱ्याला मास्क लावला होता. त्यामुळे शिंदे यांनी त्याला हटकले. 'तू कोण आहेस, येथे कशासाठी



आलास, कोणाकडे आलास, कोणाला भेटायचे आहे,' असे त्यांनी विचारले. मात्र, संशयिताने उर्मट उत्तरे दिली. 'ए चल, तू तेरा काम कर, मै अलग टाईप का इन्सान हू', असे तो म्हणाला. त्यानंतरही शिंदे यांनी त्याच्याकडे विचारणा केली. त्यावेळी त्याने खिशातील पिस्तूल दाखवले. त्यामुळे शिंदे यांनी आरडाओरडा केला. कॉलनीतील इतर लोकांना बोलावले. त्यांचा आवाज ऐकून बंगल्याच्या आत गेलेला चोरटा बाहेर आला. भिंतीवरून उडी मारून तो आणि बाहेर थांबलेला त्याचा साथीदार दुचाकीवरून पळून जात होते. त्याचवेळी कॉलनीतील काहीजण तेथे आल्याने दुचाकीवरील संशयिताने पिस्तूलातून एक गोळी जमिनीवर झाडली. त्यानंतर दोघेही दुचाकीवरून पळाले.

शिंदे यांनी तळेगाव दाभाडे पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक किशोर पाटील, परिमंडळ दोनचे पोलिस उपायुक्त बापू बांगर, सहायक आयुक्त देविदास घेवारे यांनी घटनास्थळी धाव घेतली. चोरटे दुचाकीवरून जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरून मुंबईच्या दिशेने पळून गेल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून माग काढण्यात येत आहे.

# पुण्यात दररोज एक जण गमावतोय जीव!

## पुण्यातील रस्ते अपघातांची गंभीर समस्या : जानेवारी ते मार्च महिन्यात शहरात 382 अपघात

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील रस्ते अपघातांची गंभीर समस्या पुन्हा एकदा प्रकर्षाने समोर आली आहे. यंदा जानेवारी ते मार्च महिन्यात शहरात ३८२ अपघात घडले असून, त्यात ९२ जणांचा मृत्यू झाला आहे. शहरात रोज एका व्यक्तीला रस्ते अपघातात जीव गमावावा लागत असून, रोज चार अपघात घडत आहेत. दरम्यान, ब्लॅकस्पॉटच्या ठिकाणी केलेल्या उपाययोजनांमुळे अपघाती मृत्यू कमी झाल्याचा दावा शासकीय यंत्रणांकडून केला जात आहे.

महामार्ग पोलिसांनी अपघातांची आकडेवारी जाहीर केली आहे. यंदा जानेवारी ते मार्च या कालावधीत पुणे शहरात ३८२ अपघात घडले आणि त्यात ९२ जणांचा मृत्यू झाला. गेल्या वर्षातील याच कालावधीच्या तुलनेत अपघातांची संख्या ७७ ने वाढली असून, मृत्यू १३ ने घटले आहेत. पुण्यातील ग्रामीण भागात यंदा जानेवारी ते मार्चदरम्यान ५०७ अपघात झाले असून, २२१ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत अपघातांमध्ये ८४ ने वाढ झाली असून, मृत्यू १४ ने घटले आहेत.




**पुण्यातील अपघात**

| कालावधी | भाग | अपघात | मृत्यू |
|---|---|---|---|
| जानेवारी ते मार्च २०२३ | शहर | ३०५ | १०५ |
| जानेवारी ते मार्च २०२४ | शहर | ३८२ | ९२ |
| जानेवारी ते मार्च २०२३ | ग्रामीण | ४२३ | २३५ |
| जानेवारी ते मार्च २०२४ | ग्रामीण | ५०७ | २२१ |

> अनेक ब्लॅकस्पॉटच्या ठिकाणी रस्ते अभियांत्रिकीच्या दृष्टिकोनातून असलेले दोष दूर करण्यात आले. याचबरोबर अनेक प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्यात आली. नवले पुलावर सातत्याने अपघात घडत असल्याने तेथे वेग मर्यादा कमी करण्यात आली. या सर्व उपाययोजनांमुळे अपघाती मृत्यू कमी झाले आहेत.
>
> **- संजीव भोर, प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी.**

यंदा जानेवारी ते मार्च या कालावधी अपघाती मृत्यू कमी झाले असले तरी शहरात दररोज एकाचा आणि ग्रामीण भागात दररोज दोन ते तीन जणांचा अपघाती मृत्यू होत आहे. त्यामुळे अपघात आणि अपघाती मृत्यू रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर बोलताना प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर म्हणाले की, मागील काही महिन्यांत शहर आणि ग्रामीण भागातील ब्लॅकस्पॉटच्या ठिकाणी उपाययोजनांसाठी रस्ता सुरक्षा समितीच्या माध्यमातून पावले उचलण्यात आली आहेत. याअंतर्गत पुणे-सोलापूर, पुणे-नगर, पुणे-कोल्हापूर, पुणे-मुंबई या रस्त्यांची पाहणी प्रादेशिक परिवहन कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी केली. या पाहणीतून ब्लॅकस्पॉटच्या ठिकाणी असलेल्या समस्या शोधण्यात आल्या. त्यानंतर त्यावर तातडीने करावयाच्या उपाययोजनांचा आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यानुसार प्रमुख रस्त्यांवर तातडीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

---

# आपत्कालीन वैद्यकीय कक्षामुळे प्रवाशांना जीवदान!

## पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात आपत्कालीन वैद्यकीय कक्ष सुरू : पाच महिन्यांत 618 रुग्णांवर उपचार

**पुणे | प्रतिनिधी**

रेल्वे प्रवाशाला तातडीची वैद्यकीय मदत आता स्थानकातच उपलब्ध होत आहे. यासाठी पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात आपत्कालीन वैद्यकीय कक्ष सुरू आहे. या कक्षात गेल्या पाच महिन्यांत ६१८ रुग्णांवर आपत्कालीन स्थितीत उपचार करण्यात आले आहेत. याचबरोबर १० प्रवाशांना प्राथमिक उपचार करून त्याला नजीकच्या रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले.

आपत्कालीन वैद्यकीय कक्ष चालविण्याचे कंत्राट रुबी हॉल रुग्णालयाला देण्यात आले आहे. पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलीस ठाण्याशेजारील जागेत आपत्कालीन वैद्यकीय कक्ष गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस सुरू झाला. या कक्षाच्या माध्यमातून नोव्हेंबर ते मार्च या पाच महिन्यांत कक्षात ६१८ रुग्णांवर उपचार करण्यात आले. या कक्षात दरमहा शंभरहून



> रेल्वे प्रवासादरम्यान दुखापत झालेले रुग्ण प्रामुख्याने आपत्कालीन वैद्यकीय कक्षात उपचारासाठी येत आहेत. याचबरोबर काही दिवसांपूर्वी एका गाडीमध्ये प्रवाशांना अन्नातून विषबाधा झाली होती, त्यावेळीही कक्षातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने धाव घेऊन उपचार केले.
>
> **- डॉ. बेहराम खोडाईजी, मुख्य कार्यकारी अधिकारी, रुबी हॉल क्लिनिक.**

**असा आहे आपत्कालीन वैद्यकीय कक्ष...**

- आपत्कालीन कक्ष २४ तास सुरू
- कक्षात एक डॉक्टर, दोन परिचारिका
- इसीजी, डिफ्रिबिलेटर, नेब्युलायझर आदी सुविधा
- जीवनावश्यक औषधे उपलब्ध
- प्रथमोपचार मोफत, तर इतर उपचार अल्प दरात
- नजीकच्या सरकारी रुग्णालयात नेण्यासाठी रुग्णवाहिका

अधिक रुग्णांवर उपचार केले जात आहेत. गेल्या पाच महिन्यांत रेल्वे गाडीत अथवा फलाटावर जाऊन २१९ रुग्णांवर उपचार करण्यात आले. याचबरोबर ३९९ रुग्णांनी कक्षात येऊन उपचार घेतले आहेत, अशी माहिती रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. संजीव तांदळे यांनी दिली.

रेल्वे गाडीत चढताना अथवा उतरताना अथवा इतर अन्य कारणांमुळे जखमी झालेल्या प्रवाशांवर या कक्षात मोफत प्रथमोपचार केले जात आहेत. याचबरोबर आजारी असलेल्या प्रवाशांवर केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेच्या दरांनुसार उपचार केले जात आहेत. आपत्कालीन वैद्यकीय कक्षात औषध विक्री केंद्र सुरू करून कक्ष चालविणाऱ्या संस्थेला उत्पन्न मिळविता येत आहे, अशी माहिती रेल्वेचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ. मिलिंद हिरवे यांनी दिली.

# विकास करण्यासाठी महायुतीत : अजित पवार

## अजित पवारांची श्रीरंग बारणेंसाठी जोरदार फटकेबाजी कार्यकर्त्यांना सज्जड दम

**पिंपरी | प्रतिनिधी**

अजित पवारांनी श्रीरंग बारणेंसाठी जोरदार फटकेबाजी केली. अजित पवारांनी त्यांच्या शैलीत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना सज्जड दम दिला आहे. कार्यकर्त्यांनो गंमत- जमत मध्ये काही करू नका. काही केलं तर लगेच कळतं. तुम्ही गंमत- जंमत केली (बारणे विरोधात काम) तर तुमचा बंदोबस्त करेल, अशा शब्दांत अजित पवारांनी कार्यकर्त्यांना सज्जड दम देत श्रीरंग बारणे यांच्या पाठीशी उभं राहण्याचं आवाहन देखील केलं आहे. मी सत्तेला हापापलेलो नाही. सत्तेत राहून विकास काम करण्यासाठी महायुतीत सहभागी झालो, असं ही अजित पवारांनी स्पष्ट केलं. ते पिंपरीत महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचार सभेत बोलत होते.

पुढे ते म्हणाले, विकास काम करण्याकरिता महायुतीत सहभागी झालो आहे. मी सत्तेला हापापलेलो नाही. सत्ता येत असते, सत्ता जात असते. सत्तेचा ताम्रपट घेऊन कुणी जन्माला आलं नाही. यशवंतराव चव्हाण सांगायचे शेवटच्या घटकाच्या मदतीकरिता सत्ता लागते. सत्ता नसेल तर आपण विरोधी पक्षात असू. आंदोलन, मोर्चा, उपोषण, भाषण करू शकतो. यापेक्षा पुढे काही नाही. म्हणून नरेंद्र मोदींना पुन्हा एकदा पंतप्रधान करायचं असल्याने महायुतीचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणायचे आहेत.

मावळ लोकसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत महायुतीची सभा होत आहे. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार श्रीरंग बारणेंसाठी अजित पवार सभा घेतायेत. श्रीरंग बारणेंनी गेल्या लोकसभेत पार्थ पवारांचा दारुण पराभव केला होता. हा पराभव पचवून वडील अजित पवार थेट बारणेंसाठी प्रचारसभा घेतायेत. याच सभेत बोलताना राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्याने मनातील खंत बोलून दाखवली आहे. महायुतीत खदखद असल्याची खंत सुनील शेळकेंनी अप्रत्यक्षपणे बोलून दाखवलं. मागील चार वर्षे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस असा संघर्ष केला. मात्र समीकरणं बदलली आणि आपण हातात हात घालून काम करायला लागलो, असं सुनील शेळके म्हणालेत.

साडे चार वर्षे खूप संघर्ष पाहिला. मात्र जोपर्यंत माझी नियत साफ आहे, तोपर्यंत माझ्याकडून मावळचा विकास होत राहील. दिवसा धनुष्यबाण आणि रात्री कोणी मशाल करत असेल, तर चार जून नंतर मशाली समोरचे चेहरे कोण होते? हे सुनील शेळके जाहीरपणे सांगणार आहे. जिथं राहायचं तिथं निष्ठेने राहायचा, जिथं शब्द द्यायचा तिथं पक्क राहायचं. हे मी वरिष्ठांकडून शिकलेलं आहे, असं म्हणत दोन्ही पक्षाशी सलगी असणाऱ्या कार्यकर्त्यांना सुनील शेळके यांनी तंबी दिली.

बारामतीचे युवराज सांगतायेत आम्ही शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार घेऊन पुढं चाललो आहे. तेच युवराज भाजप सोबत जाण्यासाठी आग्रही होते. मात्र आज ते निष्ठेची भाषा करतायेत. जेंव्हा बारामती आणि मावळचा निकाल लागेल. तेव्हा आम्ही गुलाल उधळू, त्यावेळी आमच्या सामील होऊ नका. म्हणाला आम्ही तुमचेच आहेत, असं सुनील शेळके मावळच्या सभेत म्हणाले.



### 'ती' खंत बोलून दाखवली

» श्रीरंग बारणे यांना उमेदवारी घोषित केल्यावर मी महायुतीचा धर्म पाळेन, हे ठामपणे जाहीर केलं. अजित दादांच्या सुचनेने आम्ही इमाने इतबारे काम सुरू केलं. पण अनेकांना आश्चर्य वाटलं. उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी सुनील शेळके उघडपणे बारणेंना विरोध करत होता. मग अचानक पलटी का घेतली? कारण बारणेंना मी लेखाजोखा मांडायला सांगितला होता, तो त्यांनी मांडला. म्हणूनच आज बारणेंना आम्ही पुन्हा खासदार करण्यासाठी झटत आहोत. महायुतीतील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी झोकून काम करायला हवं. घराघरात पोहचायला हवं, असं म्हणत सुनील शेळके यांनी महायुतीतील खदखद पुन्हा एकदा बोलून दाखवली.

### राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना सज्जड दम

» अजित पवार म्हणाले, माझं राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना सांगणं आहे. गंमत- जंमत करण्याचा प्रयत्न करू नका. काही गोष्टी म्हणजे, गंमत – जंमत केली तर लगेच कळतात. तुम्ही गंमत – जंमत केली, मी तुमचा बंदोबस्त करेल. ती वेळ माझ्यावर येऊ देऊ नका असा सज्जड दम अजित पवारांनी दिला. पुढे ते म्हणाले, मॅच फिक्सिंग करायची नाही. इमाने इतबारे श्रीरंग बारणे यांचं काम करायचं आहे. माझा शंभर टक्के पाठिंबा शिरूरमध्ये शिवाजी आढळराव आणि मावळमध्ये श्रीरंग बारणे यांनाच आहे.

---

# अवकाळीनेच राजगुरुनगर जलमय वाऱ्यासह जोरदार पाऊस

## वादळी पावसामुळे नागरिकांची, छोट्या व्यावसायिकांची, वीटभट्टी धारकांची मोठी धांदल उडाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात गुरुवारी (दि. 9) झालेल्या जोरदार वादळी पावसामुळे शहरात पाणीच पाणी झाले होते. वाडा रस्त्यावर गटार तुंबले काही बुजवले गेल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर आले. काही दुकानात आणि काही गृहप्रकल्पांच्या पार्किंगमध्ये पावसाचे पाणी शिरले.

गेली महिन्याभरापासून वाढतच असलेल्या उकाड्याने नागरिक पुरते हैराण झाले होते. मात्र अखेर गुरुवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास राजगुरूनगर परिसरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे वातावरणात काहीसा थंडावा पसरल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला अचानक झालेल्या या वादळी जोरदार पावसामुळे नागरिकांची, छोट्या व्यावसायिकांची, वीटभट्टी धारकांची मोठी धांदल उडाली. वादळ आणि पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील नागदी पिकांचे नुकसान झाले. उन्हाळी बाजरी काढणीस आली होती तिचे नुकसान झाले.

वादळी अर्धा तास झालेल्या पावसामुळे शहरात पाणीच पाणी झाले. राजगुरूनगर शहरात अनेक रस्त्यांची कामे सुरु आहेत तर पाणी योजना आणि गटार योजनेची कामे गेली चार पाच वर्षांपासून सुरु आहेत. अर्धवट झालेल्या कामांमुळे शहरातील सर्वच ठिकाणी गटार यंत्रणा बंद आहे.

रस्ते केले मात्र गटार व्यवस्था करण्यात आली नाही. शहरात काँक्रिटीकरणाचे रस्ते झाले मात्र पाणी व्यवस्थापन करण्यात नगरपरिषदेला अपयश आले आहे. शहरात वाडा रस्त्यावर अनेक सहकारी गृहरचना प्रकल्प झाले आहेत त्यांनी मुख्य गटारावरील पाणी जाणारी लाइन बुजवल्या आहेत. त्यामुळे पाणी जाण्यासाठी सर्व मार्ग बंद झाले आहेत.



### थोडाच पाऊस झाला तर येथे...

» वाडा रस्त्यावर संगम क्लासिक, खेड पंचायत समितीजवळ नगर परिषदेच्या जवळ आदी भागात पाणी जाण्यासाठी सोय नाही. त्यामुळे थोडासा पाऊस झाला की सर्वच पाणी रस्त्यावर येऊन तळे साचते त्याचा त्रास स्थानिक नागरिक आणि रस्त्यावरून जाणा-या नागरिकांना मोठ्या होत आहे. गटाराचे सांडपाणी रस्त्यावर आल्याने मोठी दुर्गंधी सुटते याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. अर्धा एक तास झालेल्या पावसामुळे पाणी व्यवस्थापन विभागाचा बोजवारा उडाला आहे.

# वाघेरेंच्या प्रचारार्थ आदित्य ठाकरे मैदानात

## युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांची तरुणाईमध्ये क्रेझ खारघरमध्ये रोड-शोला तुफान प्रतिसाद

**पुणे | प्रतिनिधी**

आत्तापर्यंत झालेल्या लोकसभा निवडणुकीतील मतदानानंतर हाती येणारे अंदाज पाहता इंडिया आघाडीकडे मतदारांचा कल स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे ४०० तर सोडा, २०० पार जाणं सुद्धा भारतीय जनता पार्टीला कठीण असेल, असे युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे पनवेल येथे रोडशोसाठी आले असता म्हणाले. ते ३३ मावळ लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत व लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ आले होते.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील खारघर येथून आदित्य ठाकरे यांच्या रोड शोला प्रारंभ करण्यात आला. महाविकास आघाडीच्या मित्र पक्षांतील शेकडो कार्यकर्त्यांनी आपापल्या पक्षांचे झेंडे लावत भव्य मोटार सायकल रॅली काढली होती. भव्य मोटार वसायकल रॅली आणि रोड-शो सुरू होण्यापूर्वी आदित्य ठाकरे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधला. आमचे मावळ मतदार संघातील भावी खासदार संजोग वाघेरे पाटील यांना भेटण्यासाठी मी आलो आहे, असं म्हणत त्यांनी वार्तालापास प्रारंभ केला. ते पुढे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीला जेव्हा समोर पराभव दिसू लागतो किंवा ते जेव्हा जेव्हा अडचणी येतात तेव्हा तेव्हा ते देशामध्ये धार्मिक तेढ निर्माण करतात. जातीयवाद उफाळून आणतात किंवा प्रांतवाद निर्माण करतात. परंतु देशासमोर महागाई आणि बेरोजगारी हे दोन महत्त्वाचे मुद्दे असताना त्याबद्दल ते चकार शब्दही काढत नाहीत.

पियुष गोयल यांनी केलेल्या आरोपांचा खरपूस समाचार घेताना आदित्य ठाकरे म्हणाले की, दहा वर्षांनी का होईना परंतु पियुष गोयल यांना महाराष्ट्राची आठवण झाली हे आपले नशीबच समजायचे. त्यांच्याकडे अर्थ, रेल्वे अशी महत्त्वाची खाती होती परंतु त्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रासाठी काहीही केले नाही. आज देशातील रेल्वे स्थानकांची नावे बदलली जात आहेत परंतु परिस्थिती मात्र अजिबात बदललेली नाही. पियुष गोयल यांनी महाराष्ट्र हिताचे एखादे जरी काम केले असेल तरी ते मला सांगा. कोरोना काळामध्ये २३ मार्च रोजी परप्रांतातील मजदूरांना त्यांच्या घरी जाण्यासाठी रेल्वे गाड्या सुरू करा असा आम्ही आक्रोश करत होतो. तेव्हा या महाशयांना महाराष्ट्राकडे बघण्याची सवड नव्हती.



### युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांची तरुणाईमध्ये क्रेझ..

» आदित्य ठाकरे यांच्या रोडशोला खारघरमध्ये न भूतो न भविष्यती असा प्रतिसाद लाभला. फार मोठ्या संख्येने नागरिक त्यांना अभिवादन करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. यामध्ये तरुणांची उपस्थिती लक्षणीय होती. माध्यमांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे यांच्या समवेत शिवसेना उपनेते तथा आमदार सचिन भाऊ अहिर, जिल्हा संपर्कप्रमुख बबन दादा पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, काँग्रेस पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष सुदाम गोकुळ शेठ पाटील,शिवसेना पनवेल विधानसभा संपर्कप्रमुख वैभव सावंत, शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख कल्पना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला पळविले : ठाकरे

» महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला पळवून नेण्याच्या विषयावर देखील आदित्य ठाकरे यांनी भाजपा आणि मित्र पक्षांवर तोंडसुख घेतले. ते म्हणाले की अगदी जून २०२२ पर्यंत घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांना असं वाटत होतं की वेदांता फॉक्सकोन महाराष्ट्रातच राहील. त्यांनी एखाद्या कॉन्ट्रॅक्टर प्रमाणे वक्तव्य केले होते. कारण त्यांच्या आजूबाजूला नेहमी कॉन्ट्रॅक्टर असतात. तळेगाव येथे होणारा हा प्रकल्प पुढे गुजरातला गेल्यानंतर तो देशाबाहेर निघून गेला. देशात सुरू असलेल्या हुकूमशाही बद्दल देखील त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की जेव्हा जेव्हा तुम्ही सत्य मांडायचा प्रयत्न करता तेव्हा तुमच्यावरती गुन्हे दाखल होतात. उद्या जर का तुम्ही भारतीय जनता पार्टीच्या विरोधात एखादी सत्यवादी बातमी लिहीलीत तर ही मंडळी पत्रकारांवर देखील गुन्हे दाखल करतील.

# दहावीच्या परीक्षेसाठी राज्य मंडळाकडून शुल्कवाढ

## जुलै-ऑगस्ट 2024मध्ये होणारी पुरवणी परीक्षा, फेब्रुवारी-मार्चमध्ये होणारी मुख्य परीक्षा 2025साठी नवे शुल्क आकारले जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षाशुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जुलै-ऑगस्ट २०२४मध्ये होणारी पुरवणी परीक्षा, फेब्रुवारी-मार्चमध्ये होणारी मुख्य परीक्षा २०२५साठी नवे शुल्क आकारले जाणार आहे.

राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी नव्या शुल्काबाबतच परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. राज्य मंडळाच्या कार्यकारी मंडळाने शुल्कवाढीला मंजुरी दिली आहे. त्यानुसार आता नियमित विद्यार्थ्यांना ४७० रुपये परीक्षा शुल्क, २० रुपये प्रशासकीय शुल्क, २० रुपये गुणपत्रिका लॅमिनेशन शुल्क, २० रुपये प्रमाणपत्र शुल्क, १० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय), १०० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र विषय), १३० रुपये खासगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (माहितीपुस्तिकेसह), खासगी विद्यार्थी नोंदणी शुल्क एक हजार २१० रुपये आकारले जाणार आहे. श्रेणीसुधार परीक्षेसाठी ९३० रुपये परीक्षा शुल्क, २० रुपये प्रशासकीय शुल्क, २० रुपये गुणपत्रिका लॅमिनेशन शुल्क, १०० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क असे शुल्क असेल. पुन:परीक्षार्थीसाठी ४७० रुपये परीक्षा शुल्क, २० रुपये प्रशासकीय शुल्क, २० रुपये गुणपत्रिका शुल्क, १० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय), १०० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र विषय) असणार आहे.

यापूर्वी २०२३ मध्ये १० टक्के शुल्क वाढ करण्यात आली होती. त्यात नियमित, पुन:परीक्षार्थींना ४२० रुपये परीक्षा शुल्क, २० रुपये प्रशासकीय शुल्क, २० रुपये गुणपत्रिका लॅमिनेशन शुल्क, २० रुपये प्रमाणपत्र शुल्क, १० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क, तर खासगी विद्यार्थ्यांना ११० रुपये नावनोंदणी अर्ज (माहितीपुस्तिकेसह), खासगी विद्यार्थी नोंदणीशुल्क एक हजार १०० रुपये आकारण्यात आले होते. श्रेणीसुधार परीक्षेसाठी ८४० रुपये शुल्क घेण्यात आले होते.



### तीन वर्षे दहा टक्के शुल्कवाढ

» राज्य मंडळाने २०१७ मध्ये केलेल्या शुल्कवाढीनंतर सहा वर्षे शुल्कवाढ केलेली नव्हती. त्यामुळे गेल्या वर्षी शासनाकडे शुल्कवाढीचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यात शासनाने तीन वर्षे प्रतिवर्षी दहा टक्के यानुसार शुल्कवाढीला मान्यता दिली. त्यानुसार शुल्कवाढ लागू करण्यात आली आहे, असे राज्य मंडळाकडून सांगण्यात आले.